महाराष्ट्र शासन
(सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग)
*जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, औरंगाबाद*

सामाजिक न्याय भवन, इमारत A Wing, पहिला मजला, शिवाजी हायस्कूलच्या शेजारी, शासकिय दुध डेअरी परिसर, खोकडपुरा, औरंगाबाद पिन-४३१००५.
दूरध्वनी क्र. ०२४०-२४७३४९४, ईमेल-cvcaurangabad@gmail.com टोल फ्री नं. १८००२३३०४४४ वेबसाईट barti.maharashtra.gov.in

**क्र. जि.जा.प्र.प.स,औ /आस्था/** BANRF-2019/2020 /**२०२१-२२/** 360 **दि.०९.०२.२०२२**

**प्रति,**
मा. महासंचालक,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था,
(बार्टी) पुणे.

**विषयः-** डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती BANRF-2019 व BANRF-2020 साठी गठीत केलेल्या निवड समितीने तयार केलेली निवडयादी सादर करणेबाबत.

**संदर्भ :** आपले पत्र क्रमांक ४८३, ४८४ व ४८५ दिनांक २७.०१.२०२२

**महोदय,**

उपरोक्त विषयाबाबत आपल्या संदर्भाधिन पत्राच्या अनुषंगाने सविनय सादर करण्यात येते की, डॉ.बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती BANRF-2019 व BANRF-2020 या दोन वर्षांच्या अनुषंगाने योजनेचा लाभ घेण्यासाठी पात्र अर्जदारांमधुन विहीत संख्येनुसार अर्जदारांची निवड करण्यासाठी माझ्या अध्यक्षतेखाली तीन सदस्यीय निवड समिती गठीत करण्यात आली. सदर समितीमध्ये माझ्यासह डॉ. प्रताप कलावंत, उपकुलसचिव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद व श्री. प्रदिप मुरलीधर भोगले, संशोधन अधिकारी, जिल्हा जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती, जालना यांचा समावेश आहे.

सदर निवड समितीने दिनांक ३१.०१.२०२२ व दिनांक ०३.०२.२०२२ ते ०९.०२.२०२२ या कालावधीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे व जिल्हा जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती, औरंगाबाद या कार्यालयात सलगपणे बैठका घेतल्या. सदर बैठकांमध्ये योजनेच्या अंमलबजावणीबाबत विहित केलेल्या मार्गदर्शक सुचना, योजनेचे निकष व निवडीची प्रचलित कार्यपध्दती इत्यादींचा समितीने बारकाईने अभ्यास करून डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती BANRF-2019 व BANRF-2020 या दोन्ही वर्षातील पात्र विद्यार्थ्यांमधुन विहीत संख्येनुसार प्रत्येकी २०० याप्रमाणे एकुण ४०० विद्यार्थ्यांची निवडयादी व त्या अनुषंगाने विद्याशाखानिहाय प्रतिक्षायादी तयार केली आहे.

सदर अनुषंगाने निवड समितीच्या बैठकांचे इतिवृत, विद्यार्थ्यांची विद्याशाखानिहाय व प्रवर्गनिहाय निवडयादी व प्रतिक्षायादी यासोबत सविनय सादर करण्यात येत आहे.

आपला विश्वासु
09/02/2022
(एस.आर.दाणे)
उपायुक्त तथा सदस्य,
जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती,
औरंगाबाद

सोबत - वरीलप्रमाणे
समितीच्या मान्यतेने

**डॉ.बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती (BANRF) 2019 व 2020 करीता निवड करण्यासाठी नियुक्त केलेल्या समितीची बैठक दिनांक 31/1/2022 चे इतिवृत्त.**

---

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी प्रतिकूल आर्थिक व सामाजिक परिस्थितीवर मात करून सन 1913 साली परदेशात उच्चशिक्षण घेण्यासाठी कोलंबियाकडे प्रस्थान केले. या ऐतिहासिक घटनेस सन 2013 मध्ये 100 वर्षे पुर्ण झाली. या घटनेच्या स्मृतिप्रित्यर्थ महाराष्ट्र शासनाने सन 2013 पासून "डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती (BANRF)" या नावाने योजना सुरू केली. सदर योजनेची डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे (BARTI) या कार्यालयामार्फत अंमलबजावणी करण्यात येते.

सदर योजनेंतर्गत सामाजिक शास्त्रे, विज्ञान व तंत्रज्ञान, वाणिज्य व व्यवस्थापन तसेच इतर विदयाशाखा इत्यादी महत्वपुर्ण क्षेत्रांमध्ये विदयापीठ अनुदान आयोग वा सक्षम प्राधिकरणाद्वारा मान्यताप्राप्त विदयापीठे वा शैक्षणिक संस्थेत पुर्णवेळ एम.फिल किंवा पी.एचडी करणा-या अनुसूचित जातीच्या विदयार्थ्यांना संशोधनकार्य करण्यासाठी अर्थसहाय्य देण्यात येते.

शासनाने पत्र क्रमांक मंत्री, सा.न्या.व.वि.स/ खा.स./ स्वी.स. /नोट/ 3396/ 2022, दिनांक 24/1/2022 नुसार सदर योजनेंतर्गत सन 2019 व 2020 या वर्षाकरीता प्राप्त झालेल्या विदयार्थ्यांच्या अर्जामधून "डॉ.बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती (BANRF)" या योजनेकरीता विहित केलेल्या निकषांनुसार सन 2019 व 2020 या दोन वर्षाकरीता प्रत्येकी 200 याप्रमाणे एकुण 400 अनुसूचित जातीच्या विदयार्थ्यांची निवड करण्यासाठी खालीलप्रमाणे निवड समिती गठीत केली आहे :-

| क्र | अधिका-याचे नाव व पदनाम | समितीतील पद |
|---|---|---|
| 1 | श्री. संजय दाणे,<br>उपायुक्त तथा सदस्य,<br>जिल्हा जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती, औरंगाबाद. | अध्यक्ष |
| 2 | डॉ. प्रताप कलावंत,<br>उपकुलसचिव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विदयापीठ, औरंगाबाद | सदस्य |



31/01/2022 31/01/2022 31/01/2022

| | | |
|---|---|---|
| 3 | श्री. प्रदिप मुरलीधर भोगले,<br>संशोधन अधिकारी, जिल्हा जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती, जालना. | सदस्य |

सदर निवड समितीची प्राथमिक बैठक दिनांक 31/01/2022 रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था,(BARTI) पुणे येथे आयोजित करण्यात आली. सदर बैठकीस निवड समितीचे सर्व सदस्य व बार्टी,पुणे येथील कार्यालयात सदर योजनेची अंमलबजावणी करणारे उपायुक्त तथा विभागप्रमुख व संशोधन अधिकारी उपस्थित होते.

सर्वप्रथम निवड समितीच्या सदस्यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती (BANRF) सन 2019 व 2020 या दोन्ही वर्षांकरीता बार्टी,पुणे कार्यालयाने दिनांक 28/6/2021 रोजी प्रसिध्द केलेल्या जाहिरातीमधील तपशिल आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती (BANRF) सन 2019 व 2020 या योजनेच्या प्रसिध्द केलेल्या मार्गदर्शक सूचना याबाबतची माहिती घेतली व सदर योजनेचे स्वरुप, निवडीचे निकष याबाबत बार्टी,पुणे येथील उपायुक्त तथा विभागप्रमुख आणि त्यांचे सहकारी यांच्याशी चर्चा केली. तदनंतर या योजनेची जाहिरात प्रसिध्द झाल्यानंतर बार्टी, पुणे कार्यालयाने याबाबतीत केलेल्या कार्यवाहीची माहिती संबंधित उपायुक्त तथा विभाग प्रमुख यांनी समिती सदस्यांना दिली. सदर बैठकीमध्ये त्यांनी असे नमुद केले की,जाहिरात प्रसिध्द झाल्यानंतर विहित मुदतीत प्राप्त झालेल्या विद्यार्थ्यांच्या अर्जांची छाननी करुन पात्र अर्जदार विदयार्थ्यांची 100 गुणांची लेखी परिक्षा घेण्यात आली आहे व त्यानंतर तज्ञपॅनल नियुक्त करुन अर्जदार विदयार्थ्यांची 50 गुणांची मुलाखत घेण्यात आली आहे. तसेच विहित निकषांनुसार शासनाने नियुक्त केलेल्या निवड समितीस पात्र अनुसूचित जातीच्या विदयार्थ्यांची निवड करायची आहे.

सदर योजनेच्या अटी व शर्ती तसेच निकष विचारात घेऊन निवड समितीने सदर बैठकीत उपायुक्त तथा विभाग प्रमुख यांना अशी विंनती केली की, पात्र विद्यार्थ्यांची निवड करण्यासाठी सक्षम प्राधिकारी यांनी अर्जदार विदयार्थ्यांना दिलेले अभ्यासक्रम नोंदणी दिनांकाबाबतचे प्रमाणपत्र, सक्षम प्राधिका-याने अर्जदार विद्यार्थ्यास दिलेले जातीचे प्रमाणपत्र, संबंधित विदयार्थ्याचा विषय व विद्याशाखा यांचा तपशिल नमूद असलेली शैक्षणिक कागदपत्रे,अर्जदार विद्यार्थ्यांचे एम.फिल/पी.एचडी प्रवेश परिक्षा (NET/SET/PET/ /GATE/M.Phil/Other) या परिक्षेचे गुणपत्रक, सन 2019 व 2020 मध्ये अर्जदार विदयार्थ्यांनी एम.फिल/पी.एचडी या अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या विद्यापीठास

एनआयआरएफ/आयसीएआर यांनी दिलेले रँकिंग तसेच सदर योजनेचा लाभ मिळण्यासाठी एकूण किती विदयार्थ्यांनी अर्ज केले आहेत? त्यापैकी किती विदयार्थ्यांना लेखी परिक्षेकरीता बोलावण्यात आले आहे तसेच त्यापैकी किती विदयार्थ्यांच्या तज्ज्ञ पॅनलमार्फत मुलाखती घेण्यात आल्या आहेत? याबाबतचा सर्व तपशिल दिनांक 03/02/2022 रोजी निवड समितीस उपलब्ध करुन दयावा, जेणेकरून निवड समितीस विहित मुदतीत पात्र अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांची निवड करणे सोईचे होईल. त्यावर उपायुक्त तथा विभाग प्रमुख यांनी सदरची सर्व माहिती बार्टी कार्यालयामध्ये असुन ती निवड समितीस उपलब्ध करुन देण्यात येईल, असे नमुद केले. त्यानंतर सदर बैठक समाप्त करण्यात आली.

31/01/2022 31/01/2022 31/01/2022

| | | |
|---|---|---|
| (प्रदिप मुरलीधर भोगले) | (डॉ. प्रताप कलावंत) | (संजय दाणे) |
| संशोधन अधिकारी | उप कुलसचिव | उपायुक्त, समाजकल्याण |

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती (BANRF) 2019 व 2020 करीता निवड करण्यासाठी नियुक्त केलेल्या समितीच्या दिनांक 03.02.2022 ते 09.02.2022 या कालावधीत आयोजित केलेल्या बैठकांचे इतिवृत्त.**

---

डॉ.बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती (BANRF) 2019 व 2020 करीता डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे या संस्थेने प्रसिध्द केलेल्या जाहिरातीनुसार प्राप्त झालेल्या अनुसूचित जातीच्या विद्‌यार्थ्यांच्या अर्जांमधून सदर योजनेकरीता विहित व प्रसिध्द केलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार सन 2019 व 2020 या वर्षाकरीता प्रत्येकी 200 विद्‌यार्थी याप्रमाणे एकूण 400 विद्‌यार्थ्यांची निवड करण्यासाठी दिनांक 03.02.2022 ते 09.02.2022 या कालावधीत सलगपणे निवड समितीच्या बैठका बार्टी, पुणे व जिल्हा जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती, औरंगाबाद या कार्यालयात आयोजित करण्यात आल्या होत्या. सदर बैठकांकरीता निवड समितीचे सर्व सदस्य हजर होते. तसेच निवड समितीस माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी उपायुक्त तथा विभाग प्रमुख बार्टी, पुणे व त्यांचे सर्व कर्मचारी बार्टी, पुणे कार्यालयात झालेल्या बैठकांकरीता हजर होते. सदर बैठकांमध्ये निवड समितीने केलेली कार्यवाही व घेतलेले निर्णय याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे. :-

डॉ.बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती (BANRF) सन 2019 व 2020 या दोन्ही वर्षांकरीता बार्टी, पुणे कार्यालयाने दिनांक 28/6/2021 रोजी प्रसिध्द केलेल्या जाहिरातीमधील तपशिल आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती (BANRF) सन 2019 व 2020 या योजनेच्या प्रसिध्द केलेल्या मार्गदर्शक सूचना या दोन्हींचे सामुहिक वाचन करण्यात आले व प्रत्येक निकषावर साधकबाधक चर्चा करण्यात आली. तसेच पात्र अनुसूचित जातीच्या विद्‌यार्थ्यांची निवड करण्यासाठी निवड समितीच्या कामकाजाची रुपरेषा ठरविण्यात आली. त्यामध्ये प्रामुख्याने योजनेचा लाभ मिळण्यासाठी विद्‌यार्थ्यांची पात्रता, पात्र विद्‌यार्थी निवडीसाठी विहित केलेले निकष व त्यास देण्यात आलेला भारांक तसेच निवड करण्यासाठी विद्‌याशाखानिहाय व प्रवर्गानिहाय आरक्षणानुसार उपलब्ध जागा या मुद्‌यांच्या अनुषंगाने चर्चा करण्यात आली. सदर मुद्‌यांचा थोडक्यात तपशिल खालीलप्रमाणे आहे. :-

9/2/2022 09/02/2022 09/02/2022

**डॉ.बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती (BANRF) सन 2019 व 2020 या योजनेचा लाभ मिळण्यासाठी विद्यार्थ्यांच्या पात्रतेचे निकष खालीलप्रमाणे आहेत.**

1) अर्जदार विदयार्थी अनुसूचित जातीचा सदस्य तसेच महाराष्ट्र राज्याचा रहिवाशी असावा.

2) BANRF-2019 करिता अर्ज करु इच्छीणा-या अर्जदार विदयार्थ्याने दिनांक 1/1/2019 ते 31/12/2019 या कालावधीत संबंधित विदयापीठात एम.फिल /पी.एचडीसाठी नोंदणी केलेली असावी. तसेच BANRF-2020 करिता अर्ज करु इच्छीणा-या अर्जदार विदयार्थ्याने दिनांक 01/01/2020 ते 31/12/2020 या कालावधीत संबंधित विदयापीठात एम.फिल/पी.एचडीसाठी नोंदणी केलेली असावी.

3) अर्जदार विदयार्थी एम.फिल/पी.एचडी नोंदणी दिनांकापासून खाजगी, शासकीय वा इतर कोणत्याही ठिकाणी नोकरी / व्यवसाय केलेला नसावा/करीत नसावा.

4) अर्जदार विदयार्थी भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती वा इतर कोणत्याही प्रकारच्या शिष्यवृत्तीचा लाभ घेत नसावा.

**अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांची पात्रता निश्चित करताना निवड समितीने विचारात घेतलेल्या बाबी खालीलप्रमाणे आहेत. :-**

1) डॉ.बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती (BANRF) 2019 **व** 2020 करीता दिनांक 28.06.2021 रोजी प्रसिध्द केलेल्या जाहिरातीनुसार एकूण 703 अर्ज ऑनलाईन पध्दतीने प्राप्त झाले. सदर 703 अर्जांपैकी 95 अर्जदार विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्जाची हार्डकॉपी कागदपत्रांसह बार्टी कार्यालयात सादर न केल्याने, 43 अर्जदार विद्यार्थ्यांनी अर्जासोबत विहित कागदपत्रे न जोडल्याने व 6 विद्यार्थ्यांचे (सन 2019 चे 4 व सन 2020 चे 2) अर्ज दूबार प्राप्त झाल्याने एकूण 144 विद्यार्थी लेखी परिक्षेस बसण्यास अपात्र ठरले व उर्वरीत 559 अर्जदार विद्यार्थी लेखी परिक्षेस बसण्यास पात्र ठरले, असे उपायुक्त तथा विभाग प्रमुख बार्टी, पुणे यांनी निवड समितीस अवगत केले.

2) लेखी परिक्षेस बसण्यास पात्र ठरलेल्या 559 विद्यार्थ्यांना लेखी परिक्षेचे प्रवेशपत्र पाठविण्यात आले. दिनांक 19.12.2021 रोजी पुणे येथे झालेल्या लेखी परिक्षेस 559 विद्यार्थ्यांपैकी 517 विद्यार्थी हजर राहीले. सदर 517 विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेण्यासाठी तज्ञ व्यक्तींचे पॅनल नियुक्त करण्यात आले व सदर 517 विद्यार्थ्यांना

दिनांक 04.01.2022 ते 06.01.2022 या कालावधीत मुलाखतीसाठी बोलविण्यात आले. सदर 517 विद्यार्थ्यांपैकी 509 विद्यार्थी प्रत्यक्ष मुलाखतीसाठी हजर झाले, असे उपायुक्त तथा विभाग प्रमुख बार्टी, पुणे यांनी निवड समितीस अवगत केले.

3) डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती (BANRF) 2019 व 2020 करीता विहित केलेल्या मार्गदर्शक सूचनामध्ये लेखी व तोंडी परिक्षेस गैरहजर राहिलेल्या अर्जदार विद्यार्थ्यांचा विचार केला जाणार नाही, अशी तरतूद स्पष्ट असल्यामुळे निवड समितीने लेखी व तोंडी परिक्षेस उपस्थित राहिलेल्या फक्त 509 विद्यार्थ्यांचा अंतिम निवडीसाठी विचार केला व त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात आली.

4) डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती (BANRF) सन 2019 व 2020 करीता लेखी परिक्षा व मुलाखतीसाठी हजर राहीलेल्या 509 विद्यार्थ्यांच्या अर्जामधील तपशिलावरुन व कार्यालयात उपलब्ध असलेल्या इतर कागदपत्रांवरुन खालील बाबींची समितीने खात्री केली. :-

(1) संबंधीत अर्जदार विद्यार्थ्यांचा एमफील/पीएचडी अभ्यासक्रमाचा नोंदणी दिनांक (Date of Registration)

(2) सक्षम प्राधिका-यांने अर्जदार विद्यार्थ्यांस दिलेले अनुसूचित जातीचे प्रमाणपत्र.

(3) संबंधीत अर्जदार विद्यार्थ्यांनी नोंदणी केलेल्या एमफील/पीएचडी अभ्यासक्रमाचा विषय व सदर विषय ज्या विद्याशाखेत अंतर्भूत आहे, ती विद्याशाखा.

(4) संबंधीत अर्जदार विद्यार्थ्यांना लेखी परीक्षेत (100 पैकी) मिळालेले गुण.

(5) संबंधीत अर्जदार विद्यार्थ्यांना मुलाखतीत (50 पैकी ) मिळालेले गुण.

(6) सक्षम प्राधिका-यांने दिव्यांग विद्यार्थ्यांना दिलेले दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र.

5) वरील अनुक्रमांक 4(1) वरील अर्जदार विद्यार्थ्यांच्या एमफील/पीएचडी अभ्यासक्रमाच्या नोंदणी दिनांकाबाबत (Date of Registration) खात्री करताना असे निर्देशनास आले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद या विद्यापीठातील काही विद्यार्थ्यांनी दोन वेगवेगळे नोंदणी दिनांक नमूद असलेली प्रमाणपत्रे प्रस्तावासोबत व प्रस्ताव दाखल केल्यानंतर बार्टी कार्यालयास सादर केली आहेत. दोन वेगवेगळे नोंदणी दिनांक असल्याने सदर विद्यार्थ्यांचा नेमका कोणता नोंदणी दिनांक ग्राहय धरावा, असा प्रश्न निर्माण झाला. याबाबत उपायुक्त तथा विभाग प्रमुख यांच्याशी चर्चा केली असता त्यांनी असे



e/2/2022 09/02/2022 09/02/2022

सांगितले की, काही विद्यार्थ्यांनी अर्जासोबत सन 2018 मधील नोंदणी दिनांक असलेली प्रमाणपत्रे सादर केली होती. त्यानंतर त्या विद्यार्थ्यांनी सन 2019 मधील नोंदणी दिनांक असलेली प्रमाणपत्रे सादर केली आहेत. नंतर सादर केलेल्या प्रमाणपत्राच्या आधारे त्या विद्यार्थ्यांचे अर्ज पात्र ठरविण्यात येऊन त्यांना लेखी परिक्षा व मुलाखतीस हजर राहण्याची परवानगी देण्यात आली आहे. तसेच या बाबीची खात्री करण्यासाठी बार्टी, पुणे या कार्यालयाने त्यांचे पत्र क्रमांक 430, दिनांक 24.01.2022 अन्वये मा. कुलगुरु, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांना पत्राद्वारे सन 2019 व 2020 या वर्षाकरीता डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती (BANRF) करीता अर्ज केलेल्या व विद्यापीठामध्ये एम. फिल/पी. एचडी अभ्यासक्रमात नोंदणी असलेल्या अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांच्या नोंदणी दिनांकाबाबतची माहिती (Date of Registration) उपलब्ध करुन देण्यांची विनंती केली होती. तसेच सदर नोंदणी दिनांकाबाबतची माहिती मागविताना बार्टी, पुणे कार्यालयाने विद्यापीठास दिलेल्या पत्रात असे नमूद केले होते की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील 39 विद्यार्थ्यांनी त्यांच्या नोंदणी दिनांकामध्ये बदल करुन जून, 2018 व जुलै, 2018 ऐवजी सन 2019 या वर्षातील नोंदणी दिनांक असलेली प्रमाणपत्रे बार्टी कार्यालयास सादर केली आहेत. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या नियमानुसार अशा प्रकारचे बदल विद्यापीठामार्फत करण्यात येतात का? तसेच संबंधित विद्यार्थ्यांनी सादर केलेली सन 2019 या वर्षातील नोंदणी दिनांक असलेली प्रमाणपत्रे अंतिम ग्राहय धरावीत किंवा कसे? याबाबत खुलासा द्यावा, अशी विनंती विद्यापीठास केली होती. त्यानुषंगाने उप कुलसचिव, पीएचडी विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांनी त्यांचे पत्र क्रमांक 773, दिनांक 01.02.2022 व पत्र क्रमांक 13812, दिनांक 02.02.2022 अन्वये पीएचडी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांच्या नोंदणी दिनांकाबाबतची माहिती सादर केली आहे. तसेच उप कुलसचिव, विद्यापीठ पदव्युत्तर प्रवेश विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांनी पत्र क्रमांक 149, दिनांक 01.01.2022 अन्वये एमफील अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांच्या नोंदणी दिनांकाबाबतची माहिती सादर केली आहे.

उपकुलसचिव, पीएचडी विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांनी दिलेल्या उत्तरामध्ये असे नमूद केले आहे की, बार्टी कार्यालयास अर्ज केलेल्या 39 विद्यार्थ्यांनी त्यांच्या नोंदणी दिनांकामध्ये बदल करुन जुन, 2018 व



9/2/2022 09/2/2022 09/02/2022

जुलै,2018 ऐवजी 2019 या वर्षातील नोंदणी दिनांक असलेली पत्रे सादर केली आहेत. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या नियमानुसार अशा प्रकारचे बदल करण्याबाबतची तरतूद विद्यापीठ अनुदान आयोग (यु.जी.सी.) च्या नियमावलीत कुठेही दिसून येत नाही. संशोधन करणा-या विद्यार्थ्याला कोणता नोंदणी दिनांक द्यायचा हा अधिकार विद्यापीठालाच आहे,कारण संशोधन व मान्यता समितीसमोर होणा-या सादरीकरणाची नोंदणी तारीख या सर्व बाबी विद्यापीठस्तरावर अंवलबून असतात.सदर खुलाश्यासोबत संबंधीत विद्यापीठाने त्यांना बार्टी कार्यालयाने विचारणा केलेल्या सर्व विद्यार्थ्यांचे सुधारित नोंदणी दिनांक कळविले आहेत.

उपरोक्त नमूद केलेली सर्व वस्तुस्थिती विचारात घेता मा. कुलगुरु, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांना बार्टी,पुणे कार्यालयाने नोंदणी दिनांकाची माहितीची विचारणा केल्यानंतर उप कुलसचिव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांनी सादर केलेली माहिती व त्यामधील विद्यार्थ्यांचे नोंदणी दिनांक (Date of Registration) संबंधीत विद्यार्थ्याच्या पात्रतेसाठी विचारात घेण्याचा निवड समितीने निर्णय घेतला.

**6)** डॉ.बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती (BANRF) सन 2019व 2020 या योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्ज केलेल्या व लेखी परिक्षा आणि मुलाखतीस उपस्थित राहिलेल्या एकूण 509विद्यार्थ्यांचे एमफील व पीएचडी अभ्यासक्रमाचे विषय व सदर विषयाची विद्याशाखा याबाबत अर्जदार विद्यार्थ्यांनी अर्जामध्ये नमूद केलेली माहिती तपासली असता असे निदर्शनास आले की,काही विद्यार्थ्यांनी त्यांच्या विषयाची विद्याशाखा 'सामाजिक शास्त्र व मानव्यशास्त्र' अशी असताना अर्जामध्ये 'इतर विद्याशाखा' अशी चूकीची विद्याशाखा नमूद केली आहे .तर काही विद्यार्थ्यांनी त्यांच्या विषयाची विद्याशाखा 'विज्ञान व तंत्रज्ञान' असताना अर्जामध्ये 'इतर विद्याशाखा' अशी चूकीची विद्याशाखा नमूद केली आहे.त्यामुळे निवड समितीतील तज्ञ सदस्य तथा उप कुलसचिव यांच्या मदतीने प्रत्येक अर्जाची छाननी करून संबंधीत विद्यार्थ्यांचा एमफील/पीएचडी अभ्यासक्रमाचा विषय विचारात घेवून त्यांचा समावेश सुयोग्य विद्याशाखेत केला आहे.

**7)** सन 2019व 2020या दोन वर्षांकरीता डॉ.बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती (BANRF) या योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्ज केलेल्या व लेखी परिक्षा आणि मुलाखतीस उपस्थित असलेल्या एकूण 509विद्यार्थ्यांच्या अर्जांची छाननी केली असता असे



09/02/2022

निदर्शनास आले की ,काही विद्यार्थ्यांनी BANRF सन 2019करीता अर्ज केले आहेत परंतू अर्जासोबत जोडलेल्या प्रमाणपत्रावरुन किंवा विद्यापीठाने नंतर सादर केलेल्या त्या विद्यार्थ्यांच्या नोंदणी दिनांकावरुन त्या विद्यार्थ्यांची नोंदणी सन 2020मध्ये झालेली आहे . तर काही विद्यार्थ्यांनी BANRF सन 2020करीता अर्ज केले आहेत, परंतू अर्जासोबत जोडलेल्या प्रमाणपत्रावरुन किंवा विद्यापीठाने नंतर सादर केलेल्या त्या विद्यार्थ्यांच्या नोंदणी दिनांकावरुन त्या विद्यार्थ्यांची नोंदणी सन 2019मध्ये झालेली आहे .हि बाब विचारात घेऊन निवड समितीने संबंधीत विद्यार्थ्यांचा एमफिल/पीएचडी अभ्यासक्रमाचा नोंदणी दिनांक प्रमाण मानून त्या विद्यार्थ्यास त्या त्या वर्षामध्ये वर्ग करुन त्यांना अंतिम निवडीसाठी विचारात घेतले आहे.

**8)** डॉ.बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती (BANRF) सन 2019व 2020 या योजनेसाठी अर्ज केलेल्या अर्जदार विद्यार्थ्यास अर्धवेळ अथवा पूर्णवेळ पगारी नोकरी करता येणार नाही तसेच इतर कोणतेही वेतन ,मानधन ,निर्वाहभत्ता ,अधिछात्रवृत्ती स्विकारता येणार नाही तसेच इतर कोणताही व्यवसाय करता येणार नाही, अशी स्पष्ट तरतूद मार्गदर्शक सूचनांमध्ये )टप्पा, 3-इतर अटी ,अट क्रमांक ( 3नमूद आहे .तथापी अर्जदार विद्यार्थ्यांच्या अर्जाची छाननी करताना याबाबत कोणताही तपशिल अर्जदार विद्यार्थ्यांनी सादर केलेला नाही .त्यामुळे सदर बाबीची पडताळणी करण्याच्या अधिन राहून लेखी परीक्षा व मुलाखतीस उपस्थित असलेल्या सर्व विद्यार्थ्यांचा विचार करण्यात आलेला आहे.

**9)** अर्जदार विद्यार्थी अनुसूचित जातीचा असावा व महाराष्ट्र राज्याचा रहिवाशी असावा, अशी अट असल्यामुळे अर्जदार विद्यार्थ्यांनी अर्जासोबत सादर केलेल्या सक्षम प्राधिकारी यांनी अर्जदारास दिलेल्या अनुसूचित जातीच्या प्रमाणपत्रांची तपासणी करण्यात आली व सदर विद्यार्थी अनुसूचित जातीचा असल्याबाबत खात्री करण्यात आली .अर्जदार विद्यार्थ्यांचे अनुसूचित जातीचे प्रमाणपत्र हे जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त होण्याच्या अधिन राहून विचारात घेण्यात आले आहे .

**डॉ.बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती (BANRF) सन 2019व 2020या योजनेकरीता अर्जदार विद्यार्थ्यांची निवड करण्यासाठी विहित करण्यात आलेले चार निकष व त्यासाठी निर्धारीत करण्यात आलेला भारांक खालीलप्रमाणे आहेत -:**

8/2/2022 09/02/2022 09/02/2022

| क्र. | तपशिल | भारांक (Weightage) |
|---|---|---|
| 1 | NET/SET/PET/GATE/M.Phil/other इत्यादी परिक्षेतील गुण | 30% |
| 2 | NIRF/ICAR Ranking | 30% |
| 3 | लेखीपरिक्षा (100गुणांची) | 30% |
| 4 | मुलाखत (50 गुणांची) | 10 % |
| | **एकूण** | **100%** |

वरील चारही निकषांच्या अनुषंगाने निवड समितीने उपायुक्त तथा विभाग प्रमुख यांच्याशी चर्चा करुन सदर निकषांचा खालीलप्रमाणे अर्थ (Interpretation) लावला आहे.:-

**निकष क्र.1 :- NET/SET/PET/GATE/M.Phil/other इत्यादी** परिक्षेतील गुण.

NET/SET/PET/GATE/M.Phil/other इत्यादी परिक्षेत सदर विद्यार्थ्यांना मिळालेल्या गुणासाठी 30 टक्के इतका भारांक राहील,असा निकष आहे. अर्जदार विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या अर्जाची तपासणी केली असता असे निदर्शनास आले की, काही विद्यापीठे PET या परिक्षेत गुण देऊन त्या आधारे पीएचडी अभ्यासक्रमास प्रवेश देतात, तर काही विद्यापीठे (उदा.सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,पुणे.) PET या परिक्षेत गुण न देता विद्यार्थ्यांना केवळ पात्र अथवा अपात्र असा शेरा देऊन पात्र विद्यार्थ्यांस पीएचडी अभ्यासक्रमास प्रवेश देतात. सदर निकषामध्ये नमूद NET/SET/PET/GATE/M.Phil/other या विविध परिक्षांचा दर्जा व मुल्यांकनाची पध्दत पूर्णत: भिन्न आहे.वर नमूद परिक्षेतील गुणांचा निकष निवडसाठी व पर्यायाने भारांक निश्चित करण्यासाठी लावला तर ज्या विद्यापीठात PET परिक्षेत गुण न देता केवळ पात्र अथवा अपात्र असा निकाल दिला जातो, अशा विद्यापीठातील विद्यार्थ्यास त्यांचा कोणताही दोष नसताना सदर निकषामधील गुणांच्या आधारे देय असणारे भारांकन मिळणार नाही. यामध्ये परिक्षेतील गुणांऐवजी तो विद्यार्थी पीएचडी अभ्यासक्रमास प्रवेश मिळण्यास पात्र आहे किंवा कसे? हा मुद्या अधिक महत्वाचा आहे. सदर बाब विचारात घेता सर्व विद्यार्थ्यांना निकषाच्या समान पातळीवर ठेवण्यासाठी परिक्षेतील गुणांच्या आधारे भारांक देणे न्यायोचित ठरत नाही,अशी समितीची स्पष्ट भूमिका आहे. त्यामुळे पीएचडी/एमफील अभ्यासक्रमात नोंदणी व प्रवेश घेण्यासाठ पात्र ठरलेल्या सर्वच विद्यार्थ्यांना एकसमान म्हणजेच 30 टक्के भारांक देण्याचा निर्णय निवड समितीने घेतला.

९/२/२०२२ 09/02/2022 09/02/2022

**निकष क्र.2 :- NIRF/ICAR Ranking-**

देशातील सर्वसाधारण विद्यापीठे व संस्था यांचे एनआयआरएफ (National Institute of Ranking Framework ) यांच्यामार्फत विहित निकषांच्या आधारे प्रत्येक वर्षी रँकिंग करण्यात येते तर कृषी विद्यापीठे व संस्था यांचे आयसीएआर(The Indain Council of Agricultural Research) यांच्यामार्फत विहित निकषांच्या आधारे प्रत्येक वर्षी रँकिंग करण्यात येते. सदर रँकिंगनुसार खालीलप्रमाणे भारांक व गुण निश्चित करण्यात आलेले आहेत :-

**सर्वसाधारण विद्यापीठे :-**

NIRF ने निश्चित केलेल्या Ranking नुसार संबंधित विदयापीठ/ संस्थेतून मिळालेल्या पदवीचा भारांक खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आला आहे :-

| **क्र** | **तपशिल** | **भारांक (Weightage )** | **दयायचे गुण** |
|---|---|---|---|
| 1 | क्रमांक 1 ते 100 रँक असलेल्या विदयापीठात नोंदणी केलेल्या उमेदवारांना | 100% | 30 |
| 2 | क्रमांक 101 ते 200 रँक असलेल्या विदयापीठात नोंदणी केलेल्या उमेदवारांना | 90% | 27 |
| 3 | क्रमांक 201 च्या नंतरचा रँक असलेल्या विदयापीठात नोंदणी केलेल्या उमेदवारांना | 80% | 24 |

**कृषी विद्यापीठे :-**

ICAR ने निश्चित केलेल्या Ranking नुसार संबंधित विदयापीठ/ संस्थेतून मिळालेल्या पदवीचा भारांक खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आला आहे :-

| **क्र** | **तपशिल** | **भारांक (Weightage)** | **दयायचे गुण** |
|---|---|---|---|
| 1 | क्रमांक 1 ते 20 रँक असलेल्या विदयापीठात नोंदणी केलेल्या उमेदवारांना | 100% | 30 |
| 2 | क्रमांक 21 ते 40 रँक असलेल्या विदयापीठात नोंदणी केलेल्या उमेदवारांना | 90% | 27 |
| 3 | क्रमांक 41 ते 67 च्या नंतरचा रँक असलेल्या विदयापीठात नोंदणी केलेल्या उमेदवारांना | 80% | 24 |



9/2/2022 09/02/2022 09/02/2022

डॉ.बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती **(BANRF)** सन **2019** करीता अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतलेल्या **सर्वसाधारण विद्यापीठे** व त्याचे रॅंकिंग तसेच त्यांना अनुज्ञेय असलेले गुण खालीलप्रमाणे आहेत-:

| क्र. | विद्यापीठाचे नांव | NIRF Ranking | एकुण विदयार्थी संख्या | अनुज्ञेय गुण |
|---|---|---|---|---|
| 1 | Adikavi Nannaya University Jayakrishnapuram,Rajahmundry East Godavari District Andharapradesh (State University) | Applicant not registered in top 200 universities | 1 | 24 |
| 2 | Bharati Vidyapeeth, Lalbahadur Shastri Marg, Pune Maharashtra (Deemed University) | 62 | 1 | 30 |
| 3 | D. Y. Patil Education society, D. Y Patil Vidyangar Kolhapur Maharashtra(Deemed University) | 101 to 200 | 1 | 27 |
| 4 | Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University University Campus Near Soneri Mahal Aurangabad Maharashtra(State University) | 85 | 122 | 30 |
| 5 | Gokhale Institute Of Politics & Economics 846 Shivajinagar Deccan Gyamkhana BMC Road Pune (Deemed University) | Applicant not registered in top 200 universities | 1 | 24 |
| 6 | Jamia Mallia Islmia University Maulana Mohammad Ali Jauhar Marg, Jamia Nagar Okhla New Delhi (Central Univesity ) | 12 | 1 | 30 |



09/02/2022 09/02/2022 09/02/2022

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 7 | Maharashtra University of Health Sciences Mhasrul Vani Dindori Road Nashik Maharashtra (State University) | Applicant not registered in top 200 universities | 2 | 24 |
| 8 | Mahatma Gandhi Antarrashtriya Hindi Vishwaidyalay Post Box No. 16 Panchtila Umri Village Arvi Road Wardha Maharashtra (Central Univesity ) | Applicant not registered in top 200 universities | 1 | 24 |
| 9 | Sam Higginbottom Institute Of Agriculture, Technology & Sciences (Formerly Allahabad Agricltural Institute ) P. O Agricultural Institute Rewa Road Allahabad Uttar Pradesh (Deemed University) | Applicant not registered in top 200 universities | 1 | 24 |
| 10 | Sandip University Trimbak Road Mahiravani Nashik Maharashtra (Private University) | Applicant not registered in top 200 universities | 2 | 24 |
| 11 | Sant Gadge Baba Amravati University Tapovan Road Amravati Maharashtra (State University) | Applicant not registered in top 200 universities | 32 | 24 |
| 12 | Savitribai Phule Pune University Ganeshkhind Pune Maharashtra (State University) | 10 | 2 | 30 |
| 13 | Shivaji University Vidyanagar Kolhapur Maharashtra (State University) | 101 to 200 | 17 | 27 |



9/2/2022 09/02/2022 09/02/2022

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 14 | Shri Jagdish Prasad Jhabarmal Tribrewala University Vidya Nagari Jhunjhunu Churu Road Chudela, Dist Jhunjhunu Rajashthan (Private University ) | Applicant not registered in top 200 universities | 1 | 24 |
| 15 | Swami Ramanand Teerth Marathwada University Dnayanteerth Vishnupuri Nanded Maharashtra (State University) | Applicant not registered in top 200 universities | 58 | 24 |
| 16 | Tata Institute Of Social Sciences V. N. Purav Marg Sion Trombay Road Deonar Mumbai (Deemed University) | 35 | 2 | 30 |
| 17 | The Rashtrasant Tukadoji Maharaj Nagpur University Ravindranath Tagore Marg, Nagpur Maharashtra (State University) | 101 to 200 | 5 | 27 |
| 18 | Mumbai University, M. G. Road Fort Mumbai Maharashtra (State University) | 81 | 8 | 30 |
| 19 | Yashwant Rao Chavan Maharashtra Open University Dnyangangotri Near Ganpaur Dam Nashik Maharashtra (State University) | Applicant not registered in top 200 universities | 1 | 24 |

डॉ.बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती (BANRF) सन 2019 करीता अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतलेल्या **कृषी विद्यापीठे** व त्याचे रॅकिंग तसेच त्यांना अनुज्ञेय असलेले गुण खालील प्रमाणे आहेत --:

09/02/2022

| अ.क्र. | विद्यापीठाचे नांव | ICAR Ranking | एकुण विदयार्थी संख्या | अनुज्ञेय गुण |
|---|---|---|---|---|
| 1 | Dr. Punjabrao Deshmukh Krishi Vidyapeeth Krishi Nagar Akola Maharashtra(State University) | 38 | 8 | 27 |
| 2 | Konkan Krishi Vidyapeeth Dapoli District Ratnagiri Maharashtra (State University) | 51 | 5 | 24 |
| 3 | Mahatma Phule Krishi Vidyapeeth Rahuri Ahmednagar Maharashtra (State University) | 27 | 6 | 27 |
| 4 | Vasantrao Naik Marathwada Agriultural University Parbhani Maharashtra (State University) | 41 | 3 | 24 |

डॉ.बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती (BANRF) सन 2020 करीता अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतलेल्या **सर्वसाधारण विद्यापीठे** व त्याचे रॅकिंग तसेच त्यांना अनुज्ञेय असलेले गुण खालीलप्रमाणे आहेत --:

| क्र. | **विद्यापीठाचे नांव** | NIRF Ranking | **एकुण विदयार्थी संख्या** | **अनुज्ञेय गुण** |
|---|---|---|---|---|
| 1 | Bangalore University Janabharathi Bangalore Karnatka (State University) | 68 | 1 | 30 |
| 2 | D. Y. Patil University Talegaon Dabhade Pune Maharashtra (Private University) | 46 | 1 | 30 |



9/2/2022 09/2022 09/02/2022

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 3 | Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University University Campus Near Soneri Mahal Aurangabad Maharashtra (State University) | 69 | 74 | 30 |
| 4 | Dr. Homi Bhabha State University Mumbai Instiutie Of Science Madam Cama Road Mumbai Maharashtra(State University) | 14 | 1 | 30 |
| 5 | Dr. Vishwanath Karad MIT World Peace University Kothrud Pune Maharashtra (Private University) | 101 to 200 | 2 | 27 |
| 6 | Gondwana University MIDC Road Gadhchiroli Maharashtra(State University) | Applicant not registered in top 200 universities | 21 | 24 |
| 7 | Gujarat Forensic Sciences University Gandhinagar Gujarat (State University) | Applicant not registered in top 200 universities | 1 | 24 |
| 8 | Indian Institute Of Technology Mumbai (As per Overall Raniking by NIRF) | 16 | 1 | 30 |
| 9 | Indian Institute Information Technology Nagpur | Applicant not registered in top 200 universities | 1 | 24 |
| 10 | Institute Of Chemical Technology Matunga Mumbai Maharashtra ( Deemed University) | 18 | 1 | 30 |
| 11 | Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharshtra University (Formarly North Maharshtra University) PB No 80 Umavinagar Jalgaon (State University) | 101 to 200 | 23 | 27 |
| 12 | Mansarovar Global University Village Gadia And Ratnakhedi Madhya Pradesh (Private University) | Applicant not registered in top 200 universities | 1 | 24 |



9/2/2022 09/2022 09/02/2022

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 13 | Mumbai University M. G. Road Fort Mumbai Maharashtra (State University) | 65 | 1 | 30 |
| 14 | Sam Higginbottom Institute Of Agriculture, Technology & Sciences (Formerly Allahabad Agricltural Institute ) P. O Agricultural Institute Rewa Road Allahabad Uttar Pradesh (Deemed University) | Applicant not registered in top 200 universities | 3 | 24 |
| 15 | Sandip University Trimbak Road Mahiravani Nashik Maharashtra (Private University) | Applicant not registered in top 200 universities | 1 | 24 |
| 16 | Sant Gadge Baba Amravati University Tapovan Road Amravati Maharashtra (State University) | Applicant not registered in top 200 universities | 5 | 24 |
| 17 | Savitribai Phule Pune University Ganeshkhind Pune Maharashtra (State University) | 9 | 48 | 30 |
| 18 | Shivaji University Vidyanagar Kolhapur Maharashtra (State University) | 101 to 200 | 11 | 27 |
| 19 | Shri Jagdish Prasad Jhabarmal Tribrewala University Vidya Nagari Jhunjhunu Churu Road Chudela, Dist Jhunjhunu Rajashthan (Private University ) | Applicant not registered in top 200 universities | 2 | 24 |
| 20 | Smt. Nathibai Damodar Thackersey Women University Mumbai Maharashtra (State University) | Applicant not registered in top 200 universities | 3 | 24 |
| 21 | Tata Institute Of Social Sciences V. N. Purav Marg Sion Trombay Road Deonar Mumbai (Deemed University) | 34 | 5 | 30 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 22 | The Rashtrasant Tukadoji Maharaj Nagpur University Ravindranath Tagore Marg, Nagpur Maharashtra (State University) | 101 to 200 | 3 | 27 |

डॉ.बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती **(BANRF)** सन **2020** करीता अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतलेल्या **कृषी विद्यापीठे** व त्याचे रॅकिंग तसेच त्यांना अनुज्ञेय असलेले गुण खालीलप्रमाणे आहेत --:

| क्र. | विद्यापीठाचे नांव | ICAR Ranking | एकुण विदयार्थी संख्या | अनुज्ञेय गुण |
|---|---|---|---|---|
| 1 | Assam Agricultural University Jorhat Assam (State University) | 41 | 1 | 24 |
| 2 | Indira Gandhi Krishi Vishwavidyalaya Kirshak Nagar Raipur Chhattisgarh(State University) | 16 | 1 | 30 |
| 3 | Punjab Agricultural University Ferozepur Road Ludhiana Punjab (State University) | 5 | 1 | 30 |

**निकष क्रमांक 3 :- लेखीपरिक्षेत अर्जदार विद्यार्थ्यास** 100 **गुणापैकी मिळालेल्या गुणाच्या आधारे अनुज्ञेय भारांक .**

बार्टी कार्यालय, पुणे यांच्यामार्फत डॉ.बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती **(BANRF)** सन 2019 व 2020 करीता अर्ज केलेल्या व बार्टी कार्यालयाने पात्र ठरविलेल्या एकूण 559 अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांची दिनांक 21.12.2021 रोजी 100 गुणाची लेखी परिक्षा बार्टी कार्यालय, पुणे यांनी आयोजित केली होती. सदर लेखी परिक्षेसाठी 100 बहुपर्यायी प्रश्नाची प्रश्नपत्रिका व त्यामध्ये प्रत्येक प्रश्नास एक गुण निर्धारीत करण्यात आला होता. सदर परिक्षेत निगेटिव्ह मार्कींग पध्दत नव्हती तसेच सदर परिक्षेकरीता 90 मिनिटाचा अवधी देण्यात आला होता. सदर परिक्षेस एकूण 559 अर्जदार विद्यार्थ्याना प्रवेशपत्र देऊन बोलविण्यात आले होते त्यापैकी प्रत्यक्ष परिक्षेसाठी 517 विद्यार्थी हजर होते. सदर विद्यार्थ्यांना लेखी परिक्षेत मिळालेले गुण जसेच्या तसे प्रमाण

मानून त्यास 30 टक्के भारांक देण्यांबाबत समितीने विचार केला आहे. थोडक्यात निकष क्रमांक 3 बाबत योजनेच्या मार्गदर्शक सूचना व जाहिरातीत नमूद केलेल्या निकष व भारांक देण्यांच्या कार्यपध्दतीत निवड समितीने कोणताही बदल केला नाही.

**निकष क्रमांक 4 :- मुलाखतीमध्ये अर्जदार विद्यार्थ्यास 50 गुणापैकी मिळालेल्या गुणाच्या आधारे अनुज्ञेय भारांक .**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती **(BANRF)** सन 2019 व 2020 करीता बार्टी कार्यालय,पुणे यांच्यामार्फत घेण्यात आलेल्या लेखी परीक्षेस उपस्थित सर्व अर्जदारांना मुलाखतीस बोलविण्यात आले होते त्यापैकी 509 विद्यार्थी हजर राहीले. बार्टी कार्यालय पुणे यांच्यामार्फत आयोजित मुलाखतीस हजर असलेल्या 509 अर्जदार विद्यार्थ्यांच्या दिनांक 04.01.2022 ते 06.01.2022 या कालावधीत बार्टी कार्यालय,पुणे यांनी नियुक्त केलेल्या तज्ञ पॅनलद्वारे मुलाखती घेण्यात आल्या. सदर तज्ञ पॅनलने खालील पाच घटक विचारात घेऊन मुलाखतीस उपस्थित अर्जदार विद्यार्थ्यांना मुलाखतीचे गुण दिले आहेत :-

| क्रमांक | मुलाखतीसाठी विचारात घेतलेले घटक | कमाल देय गुण |
|---|---|---|
| 1 | Proposal writing | १० marks |
| 2 | Literature Review | १० marks |
| 3 | Understanding /Knowledge of proposed research subject | १० marks |
| 4 | Research methodology & Presentation | १० marks |
| 5 | Communication skills | १० marks |
| | Total | ५० marks |

**बार्टी,पुणे यांनी नियुक्त केलेल्या विविध तज्ञ पॅनल यांनी वरील पाच घटकांच्या अनुषंगाने अर्जदार विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेऊन त्यांचे घटकनिहाय मुल्यांकन करुन घटकनिहाय व एकूण गुण प्रदान केले आहेत. तज्ञ पॅनलनी अर्जदार विद्यार्थ्यांना दिलेल्या घटकनिहाय गुणाबाबतच्या अभिलेखाची समितीने पडताळणी केली असता तज्ञ पॅनल यांनी गुणदान करताना विहित कार्यपध्दती अनुसरली असल्याचे निरिक्षण निवड समिती नोंदवित**

आहे.मुलाखतीसाठी निश्चित केलेल्या 50 गुणांपैकी संबंधीत विद्यार्थ्यांना मिळालेल्या एकूण गुणांसाठी 10 टक्के भारांक देण्याचा निवड समितीने विचार केलेला आहे. थोडक्यात निकष क्रमांक 4 बाबत योजनेच्या मार्गदर्शक सूचना व जाहिरातीत नमूद केलेले निकष व भारांक देण्याच्या कार्यपध्दतीत निवड समितीने कोणताही बदल केला नाही.

**डॉ.बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती (BANRF) सन 2019 व 2020 या दोन वर्षातील प्रत्येकी 200 याप्रमाणे एकूण 400 विद्यार्थ्यांची निवड करण्याकरीता निवड समितीने अनुसरलेली कार्यपध्दती :-**

BANRF 2019 व BANRF-2020 करिता प्रत्येकी **200** जागांवर निवड करण्यासाठी सदर योजनेच्या मार्गदर्शक सुचनामध्ये खालीलप्रमाणे विद्याशाखानिहाय व प्रवर्गनिहाय जागा निश्चित करण्यात आल्या आहेत :-

| क्र | विद्याशाखा | उपलब्ध जागा | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | सर्वसाधारण | महिला | दिव्यांग | एकूण |
| 1 | **Social Science & Humanities** (सामाजिकशास्त्र व मानव्यशास्त्र) | 49 | 21 | | 70 |
| 2 | **Science & Technology** (विज्ञान व तंत्रज्ञान) | 30 | 13 | | 43 |
| 3 | **Commerce & Management** (वाणिज्य व व्यवस्थापन) | 27 | 12 | | 39 |
| 4 | **Other Faculty** (इतर विद्याशाखा) | 27 | 11 | | 38 |
| | **एकूण** | **133** | **57** | **10** | **200** |

अ) **<u>सन 2019 करीता निवड समितीने 200 विद्यार्थ्यांची निवड करण्याकरीता अनुसरलेली कार्यपध्दती खालीलप्रमाणे आहे:-</u>**

1. BANRF **सन** 2019 **करीता एकूण** 293 **विद्यार्थी लेखी परीक्षा व मुलाखतीस उपस्थित होते. त्यापैकी** 7 **विद्यार्थ्यांचे नोंदणी दिनांक सन** 2020 **वर्षातील असल्यामुळे सदर** 7 **विद्यार्थी** BANRF सन 2020 च्या यादीमध्ये वर्ग करण्यात आले.तसेच BANRF सन 2020 करीता अर्ज केलेल्या 6 विद्यार्थ्यांचे नोंदणी दिनांक हे सन 2019 वर्षातील असल्यामुळे सदर 6 विद्यार्थी BANRF सन 2019 च्या यादीमध्ये वर्ग करण्यात आले.त्यामुळे BANRF सन 2019 करीता एकूण 292 विद्यार्थी झाले.सदर 292 विद्यार्थ्यांपैकी 10 विद्यार्थ्यांचे नोंदणी दिनांक हे सन 2018 या वर्षातील असल्यामुळे तसेच 1 विद्यार्थ्याचा नोंदणी दिनांक सन 2014 या वर्षातील असल्यामुळे हे 11 विद्यार्थी BANRF सन 2019 च्या यादीत अपात्र ठरले.परिणामी अंतिमत: BANRF सन 2019 करीता 281 विद्यार्थ्यांचा निवड करण्यासाठी विचार करण्यात आला.
2. डॉ.बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती (BANRF) या योजनेच्या मार्गदर्शक सूचनानुसार BANRF सन 2019 करीता विचारात घेण्यात आलेल्या 281 विद्यार्थ्यांचे विद्याशाखानिहाय वर्गीकरण खालीलप्ररमाणे आहे:-

| **क्र.** | **विद्याशाखेचे नांव** | विद्यार्थी संख्या |
|---|---|---|
| 1 | Social Science & Humanities<br>(सामाजिकशास्त्र व मानव्यशास्त्र) | 151 |
| 2 | Science & Technology<br>(विज्ञान व तंत्रज्ञान) | 73 |
| 3 | **Commerce & Management**<br>(वाणिज्य व व्यवस्थापन) | 16 |
| 4 | **Other Faculty**<br>(इतर विद्याशाखा) | 41 |
| | **Total (एकूण)** | **281** |

9/2/2022 09/02/2022 09/02/2022

3. **Social Science & Humanities** या विद्‌याशाखेतील सर्वसाधारण प्रवर्गात **49** अर्जदारांची तर महिला प्रवर्गात **21** महिला अर्जदारांची अशा एकूण **70** अर्जदरांची निवड करायची असल्याने सदर विद्‌याशाखेतील एकूण **151** अर्जदारांपैकी गुणांनुक्रमे सुरुवातीच्या **49** अर्जदाराची सर्वसाधारण प्रवर्गात निवड करण्यात आली. सर्वसाधारण प्रवर्गात निवड करण्यात आलेल्या अर्जदारांची यादी सोबत **प्रपत्र**-1 मध्ये सादर करण्यात येत आहे.तसेच एकूण **151** अर्जदारापैकी वरील प्रपत्र**-1** नुसार निवड झालेले **49** अर्जदार वगळून उर्वरीत **102** अर्जदारापैकी गुणानुक्रमे **21** महिला अर्जदारांची निवड करण्यांत आली. महिला प्रवर्गात निवड करण्यात आलेल्या महिला अर्जदारांची यादी सोबत **प्रपत्र**-2 मध्ये सादर करण्यात येत आहे. **Social Science & Humanities** या विद्‌याशाखेत एकही दिव्यांग अर्जदार उपलब्ध नसल्याने दिव्यांग प्रवर्गात निवड करण्यात आलेल्या अर्जदारांची संख्या निरंक आहे.
4. **Science & Technology** या विद्‌याशाखेतील सर्वसाधारण प्रवर्गातून **30** अर्जदारांची तर महिला प्रवर्गातून **13** महिला अर्जदारांची अशा एकूण **43** अर्जदाराची निवड करायची असल्याने सदर विद्‌याशाखेतील एकूण **73** अर्जदारांपैकी गुणानुक्रमे सुरुवातीच्या **30** अर्जदारांची सर्वसाधारण प्रवर्गात निवड करण्यांत आली. सर्वसाधारण प्रवर्गात निवड करण्यात आलेल्या अर्जदाराची यादी सोबत **प्रपत्र**-3 मध्ये सादर करण्यात येत आहे. तसेच एकूण **73** अर्जदारांपैकी वरील प्रपत्र**-3** नुसार निवड झालेले **30** अर्जदार वगळून उर्वरीत **43** अर्जदारापैकी गुणानुक्रमे **13** महिला अर्जदारांची निवड करण्यात आली.महिला प्रवर्गात निवड करण्यात आलेल्या महिला अर्जदारांची यादी सोबत **प्रपत्र**-4 मध्ये सादर करण्यात येत आहे. **Science & Technology** या विद्‌याशाखेत एकही दिव्यांग अर्जदार उपलब्ध नसल्याने दिव्यांग प्रवर्गातून निवड करण्यात आलेल्या अर्जदारांची संख्या निरंक आहे.
5. Commerce & Management या विद्‌याशाखेतील सर्वसाधारण प्रवर्गातून **27** अर्जदारांची तर महिला प्रवर्गातून **12** महिला अर्जदारांची अशा एकूण **39** अर्जदारांची निवड करायची असल्याने सदर विद्‌याशाखेतील उपलब्ध सर्व **16** अर्जदारांची सर्वसाधारण प्रवर्गात निवड करण्यात आली. सर्वसाधारण प्रवर्गातून निवड करण्यात आलेल्या अर्जदारांची यादी सोबत प्रपत्र**-5** मध्ये सादर करण्यात येत आहे. या विद्‌यशाखेत पात्र अर्जदारांची एकूण संख्या निवड करायच्या अर्जदार संख्येपेक्षा कमी



9/2/2022 09/02/2022 09/02/2022

असल्याने व या सर्व **16** अर्जदारांची सर्वसाधारण प्रवर्गात निवड झाल्याने महिला प्रवर्ग व दिव्यांग प्रवर्गात निवड केलेल्या अर्जदारांची संख्या निरंक आहे.

6. **Other Faculty** या विद्याशाखेतील सर्वसाधारण प्रवर्गातून **27** अर्जदारांची तर महिला प्रवर्गातून **11** महिला अर्जदारांची अशा एकूण **38** अर्जदारांची निवड करायची असल्याने सदर विद्याशाखेतील एकूण **41** अर्जदारांपैकी गुणांनुक्रमे सुरुवातीच्या **27** अर्जदारांची सर्वसाधारण प्रवर्गात निवड करण्यांत आली. सर्वसाधारण प्रवर्गातून निवड करण्यात आलेल्या अर्जदारांची यादी सोबत **प्रपत्र**-6 मध्ये सादर करण्यात येत आहे. तसेच **41** अर्जदारापैकी निवड करण्यांत आलेले **27** अर्जदार वगळून उर्वरीत **14** अर्जदारांपैकी केवळ **5** महिला अर्जदार उपलब्ध असल्यांने या सर्व महिला अर्जदारांची गुणानुक्रमे निवड करण्यांत आली.महिला प्रवर्गातून निवड करण्यांत आलेल्या महिला अर्जदाराची यादी सोबत **प्रपत्र**-7 मध्ये सादर करण्यात येत आहे. तसेच **Other Faculty** या विद्याशाखेत **11** पैकी केवळ **5** महिला अर्जदार उपलब्ध झाल्याने महिलांसाठीच्या उर्वरीत **6** जागा त्याच **(Other Faculty)** विद्याशाखेतील सर्वसाधारण प्रवर्गात वर्ग करण्यात आल्या व त्या जागांवर त्याच विद्याशाखेतील **(Other Faculty)** उर्वरीत शिल्लक **9** अर्जदारांपैकी **6** सर्वसाधारण प्रवर्गातील अर्जदारांची गुणानुक्रमे निवड करण्यात आली.महिला प्रवर्गतील शिल्लक जागांवर त्याच विद्याशाखेतील सर्वसाधारण प्रवर्गातील गुणानुक्रमे निवड करण्यात आलेल्या **6** अर्जदारांची यादी **प्रपत्र**-8 मध्ये सादर करण्यात येत आहे.
7. वरीलप्रमाणे चार विद्याशाखानिहाय सर्वसाधारण प्रवर्ग, महिला प्रवर्ग यानुसार निवडयादी तयार केल्यानंतर **Commerce & Management** या विद्याशाखेतील **23** जागा पर्याप्त / पुरेसे अर्जदार उपलब्ध न झाल्यामुळे शिल्लक राहिल्या.तसेच दिव्यांग प्रवर्गातील दोन अर्जदारांची निवड सर्वसाधारण प्रवर्गातून झाल्यामुळे दिव्यांग प्रवर्गाकरीता राखीव असलेल्या सर्व **10** जागा पर्याप्त/ पुरेसे अर्जदार उपलब्ध न झाल्यामुळे शिल्लक राहिल्या.अशा दोन्ही प्रवर्गातील एकूण **33** जागा शिल्लक राहिल्यामुळे सदर जागांवर **Social Science & Humanities,** या विद्याशाखेत निवड झालेल्या अर्जदाराव्यतिरिक्त शिल्लक **81** अर्जदार व **Science & Technology** या विद्याशाखेत निवड झालेल्या अर्जदाराव्यतिरिक्त शिल्लक **30** अर्जदार तसेच **Other Faculty** या विद्याशाखेत निवड झालेल्या अर्जदाराव्यतिरिक्त



9/2/2022 09/02/2022 09/02/2022

शिल्लक **03** अर्जदार अशा एकूण **114** अर्जदारांची संयुक्त गुणवत्ता यादी **(Joint Merit List)** तयार करण्यात आली व त्यामूधन **Commerce & Management** व दिव्यांग प्रवर्ग या दोन्ही गटातील एकूण **33** शिल्लक जागा गुणानुक्रमे भरण्याचा निर्णय समितीने घेतला.सदर निवड करताना सर्व विद्याशाखांना समानसंधी देण्यात येऊन सर्व विद्याशाखांतील **33** अर्जदार विद्यार्थ्यांची समन्यायीतत्वानुसार गुणानुक्रमे निवड करण्यात आली.म्हणजेच सदर **33** अर्जदारांची अन्य विद्याशाखांमध्ये रिक्त राहिलेल्या जागांवर **(Selection against vacant seats in another faculties.)** निवड करण्यात आली. अशी निवड केलेल्या अर्जदारांची यादी <u>प्रपत्र-**9**</u> म्हणून सादर करण्यांत येत आहे.)

8. **Social Science & Humanities** या विद्याशाखेतील निवड न झालेल्या **58** अर्जदारांपैकी **15** अर्जदाराची गुणानुक्रमे प्रतिक्षायादी करण्यात आली सदर प्रतिक्षायादी <u>प्रपत्र-**10**</u> मध्ये सादर करण्यात येत आहे.
9. **Science & Technology** या विद्याशाखेतील निवड न झालेल्या **21** अर्जदारांपैकी **15** अर्जदारांची गुणानुक्रमे प्रतिक्षायादी करण्यात आली. सदर प्रतिक्षायादी <u>प्रपत्र-**11**</u> मध्ये सादर करण्यात येत आहे.
10. **Commerce & Management** या विद्याशाखेतील सर्व अर्जदारांची योजनेच्या लाभासाठी निवड झाल्यामुळे या विद्याशाखेसाठी प्रतिक्षायादीवरील अर्जदारांची संख्या निरंक आहे.
11. Other Faculty **या विद्याशाखेतील निवड न झालेल्या सर्व** 03 **अर्जदारांची गुणानुक्रमे प्रतिक्षायादी <u>प्रपत्र-12</u> मध्ये सादर करण्यात येत आहे**.

ब) <u>सन **2020** करीता निवड समितीने **200** विद्यार्थ्यांची निवड करण्याकरीता अनुसरलेली कार्यपध्दती खालील प्रमाणे आहे:-</u>

1. <u>BANRF</u> **सन** 2020 **करीता एकूण** 216 **विद्यार्थी लेखी परीक्षा व मुलाखतीस उपस्थित होते. त्यापैकी** 6 **विद्यार्थ्यांचे नोंदणी दिनांक सन** 2019 **वर्षातील असल्यामुळे सदर** 6 **विद्यार्थी** BANRF सन 2019 च्या यादीमध्ये वर्ग करण्यात आले.तसेच BANRF सन 2019 करीता अर्ज केलेल्या 7 विद्यार्थ्यांचे नोंदणी दिनांक हे सन 2020 वर्षातील असल्यामुळे सदर 7 विद्यार्थी BANRF सन 2020 च्या



09/02/2022

यादीमध्ये वर्ग करण्यांत आले. त्यामुळे BANRF सन 2020 करीता 217 विद्यार्थ्यांचा विचार करण्यांत आला. सदर 217 विद्यार्थ्यांपैकी 04 विद्यार्थ्यांचे नोंदणी दिनांक हे सन 2020 या वर्षातील नसल्यामुळे सदर 04 विद्यार्थी BANRF सन 2020 च्या यादीमधून अपात्र ठरविण्यांत आले व उर्वरीत 213 विद्यार्थ्यांचा BANRF सन 2020 करीता निवड करण्यासाठी विचार करण्यात आला.

2. डॉ.बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती (BANRF) या योजनेच्या मार्गदर्शक सूचनानुसार BANRF सन 2020 करीता विचारात घेण्यात आलेल्या 213 विद्यार्थ्यांचे विद्याशाखानिहाय वर्गीकरण खालीलप्रमाणे आहे:-

| **क्र.** | **विद्याशाखेचे नांव** | संबंधीत विद्याशाखेची विद्यार्थी संख्या |
|---|---|---|
| 1 | Social Science & Humanities (**सामाजिकशास्त्र व मानव्यशास्त्र**) | 104 |
| 2 | Science & Technology (**विज्ञान व तंत्रज्ञान**) | 68 |
| 3 | Commerce & Management (**वाणिज्य व व्यवस्थापन**) | 17 |
| 4 | Other Faculty (**इतर विद्याशाखा**) | 24 |
| | **Total (एकूण)** | **213** |

3. Social Science & Humanities या विद्याशाखेतील सर्वसाधारण प्रवर्गात **49** अर्जदाराची तर महिला प्रवर्गात **21** महिला अर्जदारांची अशा एकूण **70** अर्जदारांची निवड करायची असल्याने सदर **Social Science & Humanities** या विद्याशाखेतील एकूण **104** अर्जदारांपैकी गुणानुक्रमे सुरुवातीच्या **49** अर्जदारांची सर्वसाधारण प्रवर्गात निवड करण्यात आली. सर्वसाधारण प्रवर्गातून निवड करण्यात आलेल्या अर्जदारांची यादी सोबत **प्रपत्र**-13 मध्ये सादर करण्यात येत आहे. तसेच एकूण **104** अर्जदारांपैकी वरील प्रपत्र**-13** नुसार निवड झालेले **49** अर्जदार वगळून उर्वरीत **55** अर्जदारांपैकी गुणानुक्रमे **21** महिला अर्जदारांची निवड करण्यात आली.

महिला प्रवर्गातून निवड करण्यात आलेल्या महिला अर्जदाराची यादी सोबत **प्रपत्र**-14 मध्ये सादर करण्यात येत आहे. **Social Science & Humanities** या विद्याशाखेत एकही दिव्यांग अर्जदार उपलब्ध नसल्याने दिव्यांग प्रवर्गातून निवड केलेल्या अर्जदरांची संख्या निरंक आहे.

4. Science & Technology **या विद्याशाखेतील सर्वसाधारण प्रवर्गात 30** अर्जदाराची तर महिला प्रवर्गात **13** महिला अर्जदारांची अशा एकूण **43** अर्जदारांची निवड करावयाची असल्याने सदर विद्याशाखेतील एकूण **68** अर्जदारांपैकी गुणानुक्रमे सुरुवातीच्या **30** अर्जदारांची सर्वसाधारण प्रवर्गात निवड करण्यात आली. सर्वसाधारण प्रवर्गातून निवड करण्यात आलेल्या अर्जदारांची यादी सोबत **प्रपत्र**-15 मध्ये सादर करण्यात येत आहे.तसेच एकूण **68** अर्जदारांपैकी वरील प्रपत्र**-15** नुसार निवड झालेले अर्जदार वगळून उर्वरीत **38** अर्जदारांपैकी गुणानुक्रमे **13** महिला अर्जदारांची निवड करण्यात आली. महिला प्रवर्गातून निवड करण्यांत आलेल्या महिला अर्जदाराची यादी सोबत **प्रपत्र**-16 मध्ये सादर करण्यात येत आहे.**Science & Technology** या विद्याशाखेत एकही दिव्यांग अर्जदार उपलब्ध नसल्याने दिव्यांग प्रवर्गातून निवड **करण्यात आलेल्या अर्जदारांची संख्या निरंक आहे.**
5. Commerce & Management या विद्याशाखेतील सर्वसाधारण प्रवर्गात **27** अर्जदारांची तर महिला प्रवर्गात **12** महिला अर्जदारांची अशा एकूण **39** अर्जदाराची निवड करायची असल्याने सदर विद्याशाखेतील एकूण **17** अर्जदारांपैकी सर्वच्या सर्व **17** अर्जदारांची सर्वसाधारण प्रवर्गात निवड करण्यात आली.सर्वसाधारण प्रवर्गातून निवड करण्यात आलेल्या अर्जदारांची यादी सोबत **प्रपत्र**-17 मध्ये सादर करण्यात येत आहे. या विद्याशाखेत निवड करायच्या अर्जदार संख्येपेक्षा पात्र अर्जदारांची संख्या कमी असल्याने व हया सर्वच्या सर्व अर्जदारांची सर्वसाधारण प्रवर्गात निवड झाल्याने महिला प्रवर्ग व दिव्यांग प्रवर्गातून निवड केलेल्या अर्जदारांची संख्या निरंक आहे.
6. Other Faculty या विद्याशाखेतील सर्वसाधारण प्रवर्गात **27** अर्जदाराची तर महिला प्रवर्गात **11** महिला अर्जदारांची अशा एकूण **38** अर्जदारांची निवड करायची असल्याने सदर **Other Faculty** या विद्याशाखेतील एकूण **24** अर्जदारांपैकी गुणानुक्रमे सर्व **24** अर्जदारांची सर्वसाधारण प्रवर्गात निवड करण्यात आली. सर्वसाधारण प्ररवर्गातून निवड करण्यांत आलेल्या अर्जदाराची यादी सोबत **प्रपत्र**-18



e1/2/2022 09/02/2022 09/02/2022

मध्ये सादर करण्यात येत आहे.या विद्याशाखेत निवड करायच्या अर्जदार संख्येपेक्षा पात्र अर्जदारांची संख्या कमी असल्याने व हया सर्वच्या सर्व अर्जदारांची सर्वसाधारण प्रवर्गात निवड झाल्याने महिला प्रवर्ग व दिव्यांग प्रवर्ग या दोन्ही प्रवर्गात निवड केलेल्या अर्जदारांची संख्या निरंक आहे.

7. वरीलप्रमाणे चार विद्याशाखानिहाय सर्वसाधारण प्रवर्ग, महिला प्रवर्ग यानुसार निवडयादी तयार केल्यानंतर **Commerce & Management** या विद्याशाखेतील **22** जागा पर्याप्त / पुरेसे अर्जदार उपलब्ध न झाल्यामुळे शिल्लक राहिल्या. तसेच **Other Faculty** या विद्याशाखेतील **14** जागा पर्याप्त / पुरेसे अर्जदार उपलब्ध न झाल्यामुळे शिल्लक राहिल्या तसेच दिव्यांग प्रवर्गातील एका अर्जदाराची सर्वसाधारण प्रवर्गातून निवड झाल्यामुळे दिव्यांग प्रवर्गाकरीता राखीव असलेल्या सर्व **10** जागा दिव्यांग प्रवर्गातील पर्याप्त अर्जदार उपलब्ध न झाल्यामुळे शिल्लक राहिल्या.अशा तीनही गटातील मिळून एकूण **46** जागा शिल्लक राहिल्यामुळे सदर जागांवर **Social Science & Humanities** या विद्याशाखेतील निवड झालेल्या अर्जदाराव्यतिरिक्त शिल्लक राहीलेले **34** अर्जदार व **Science & Technology** या विद्याशाखेतील निवड झालेल्या अर्जदाराव्यतिरिक्त शिल्लक राहीलेले **25** अर्जदार अशा एकूण **59** अर्जदारांची संयुक्त गुणवत्ता यादी **( Joint Merit List)** तयार करण्यात आली.या यादीतून **Commerce & Management, Other Faculty** व दिव्यांग प्रवर्ग या तीनही गटातील एकूण **46** शिल्लक जागा गुणानुक्रमे भरण्याचा समितीने निर्णय घेतला.सदर निवड करताना सर्व विद्याशाखांना समानसंधी देण्यात येऊन सर्व विद्याशाखातील **46** अर्जदार विद्यार्थ्यांची अन्य विद्याशाखांमध्ये रिक्त राहिलेल्या **46** जागांवर **(Selection against vacant seats in another facultie)** समन्यायी तत्वानुसार गुणानुक्रमे निवड करण्यात आली.अशी निवड करण्यात आलेल्या अर्जदारांची यादी <u>प्रपत्र-**19**</u> म्हणून सादर करण्यात येत आहे.

8. Social Science & Humanities **या विद्याशाखेतील निवड न झालेल्या सर्व** 08 **अर्जदारांची गुणानुक्रमे प्रतिक्षायादी करण्यात आली**. **सदर प्रतिक्षायादी** <u>**प्रपत्र-20**</u> **मध्ये सादर करण्यात येत आहे**.

e|2|2022 09/02/2022 09/02/2022

9. Science & Technology **या विद्याशाखेतील निवड न झालेल्या सर्व** 05 **अर्जदारांची गुणानुक्रमे प्रतिक्षायादी करण्यात आली. सदर प्रतिक्षायादी** <u>प्रपत्र-21</u> **मध्ये सादर करण्यात येत आहे.**

10. Commerce & Management **व** Other Faculty **या दोन्ही विद्याशाखेतील सर्व अर्जदारांची योजनेच्या लाभासाठी निवड झाल्यामुळे या दोन्ही विद्याशाखांसाठी प्रतिक्षायादीतील अर्जदारांची संख्या निरंक आहे.**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती (BANRF) या योजनेच्या मार्गदर्शक सूचनानुसार BANRF सन 2019 ची निवडयादी व प्रतिक्षा सूची वरील अ नुसार ( प्रपत्र 1 ते 12 सह ) तसेच BANRF सन 2020 ची निवडयादी व प्रतिक्षा सूची वरील ब नुसार ( प्रपत्र 13 ते 22 सह ) सविनय सादर करण्यांत येत आहे.

| (प्रदिप मुरलीधर भोगले) | (डॉ. प्रताप कलावंत) | (संजय दाणे) |
|---|---|---|
| संशोधन अधिकारी | उप कुलसचिव | उपायुक्त, समाजकल्याण |
| जिल्हा जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती, जालना | डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद | जिल्हा जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती, औरंगाबाद |
| 8/2/2022 | 09/02/2022 | 09/02/2022 |

---